बीड । महाराष्ट्र
बुधवार दि. १८ मार्च २०२६
वर्ष ५ वे । अंक ३४६
पान १ । पाने ४
किंमत ३ रूपये

दैनिक
महाराष्ट्राचा बुलंद आवाज
• छत्रपती संभाजीनगर • जालना • बीड • परभणी • लातूर • नांदेड • धाराशिव • हिंगोली • अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे । मो. : 9822152955 E-mail : dailymarathwadapatra2021@gmail.com

RNI/MAHMAR/2021/80074 Post : Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-27 https://marathwadapatra.com https://epaper.marathwadapatra.com










# राहुल गांधींनी रान उठविलेल्या 'एपस्टीन'चा मुद्दा हायकोर्टात

## केंद्रीय मंत्र्याच्या लेकीनं उचललं मोठं पाऊल अन् लगेच आदेशही...

**वृत्तसंस्था**

लोकसभेत विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी मध्य पुर्वेत सुरू असलेल्या युद्धामुळे भारताच्या ऊर्जा सुरक्षेबाबत चिंता व्यक्त केली. यावेळी बोलताना त्यांनी एपस्टीन फाइल्सचा उल्लेख करत केंद्रीय मंत्री हरदीप सिंह पूरी यांचे नाव घेतलं. तसंच प्रथमदर्शनी हे प्रकरण हिमायनी पुरी यांच्या बाजूने असल्याचं न्यायालयाने नमुद केलं आहे. हिमायनी पुरी यांनी दाखल



केलेल्या याचिकेवर सुनावणी करताना न्यायालयाने सर्व आक्षेपार्ह मजकूर त्वरित हटवण्याचे आणि तो हटवला गेला नाही, तर मध्यस्थ प्लॅटफॉर्मने २४ तासांच्या आत तो काढून टाकण्याचे निर्देश दिले आहेत. मात्र, हा आदेश केवळ भारतीय न्यायक्षेत्रात अपलोड करण्यात आलेल्या मजकुरापुरताच लागू असेल, असं दिल्ली उच्च न्यायालय यांनी स्पष्ट केलं आहे. तर मध्यस्थ प्लॅटफॉर्मसह सर्व प्रतिवादींना समन्स बजावून त्यांचे उत्तर आल्यानंतर पुढील सुनावणी करण्यात येईल, असंही न्यायालयाने सांगितलं. हिमायनी पुरी यांच्या वकिलाने कोर्टात युक्तिवाद करताना सोशल मीडियावरील आरोप हे त्यांच्या प्रतिमेला धक्का पोहोचवण्यासाठी रचलेल्या कटाचा भाग असल्याचं सांगितलं. तर माझा जेफ्री एपस्टीनशी कोणताही संबंध नाही. मी एका केंद्रीय मंत्र्यांची मुलगी असल्यामुळे मला लक्ष्य केले जात आहे. यामागे राजकीय द्वेष असण्याची शक्यता आहे, असं हिमायनी पुरी यांनी म्हटलं. शिवाय मी वित्तीय विश्लेषक, बँकर आणि गुंतवणूकदार म्हणून काम करते, त्यामुळे माझी जागतिक प्रतिमा जपणे आवश्यक आहे, असंही त्यांनी कोर्टाला सांगितलं. दरम्यान, या याचिकेत भारतापुरतेच नव्हे, तर जागतिक स्तरावर हा मजकूर हटवण्याची मागणी केली आहे.

## गॅसचं संकट मिटणार, केंद्र सरकारने घेतला सर्वात मोठा निर्णय, आता २४ तासांच्या आत



**वृत्तसंस्था**

अमेरिका-इस्रायल आणि इराण यांच्यात युद्ध सुरू असल्याने भारतात मोठे उर्जासंकट आले आहे. घरगुती तसेच व्यावसायिक गॅस सिलिंडरची मोठी कमतरता भासत आहे. त्यामुळे सामान्यांकडून संताप व्यक्त केला जात आहे. लोकांना पीएनजी, सीएनजीची कमतरता भासू नये म्हणून सरकारने आतापर्यंत अनेक निर्णय घेतले आहेत. या युद्धामुळे घरगुती गॅस सिलिंडरचा भावदेखील ६० रुपयांनी वाढला आहे. एकदा गॅस सिलिंडर बुक केल्यानंतर दुसरा गॅस सिलिंडर बुक करण्यासाठी २५ दिवसांची वाट पाहावी लागत आहेत.

### ● २४ तासांच्या आत अर्ज मंजूर करा

तसेच सरकारने ज्या घरामध्ये पीएनजीच्या माध्यमातून गॅस पुरवला जातो, त्या घरांना एलपीजी गॅस सिलिंडर दिले जाणार नाही, असाही निर्णय घेतला आहे. असे असतानाच आता घरोघरी वेळेवर गॅस पोहोचावा यासाटी सरकारने मोठा आणि महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. एखाद्या व्यक्तीने पीएनजी कनेक्शनसाठी अर्ज केलेला असेल, त्या व्यक्तीचा अर्ज अवघ्या २४ तासांच्या आत मंजूर करण्याचा आदेश सरकारने दिला आहे. जास्तीत जास्त लोकांनी एलपीजी सिलिंडरच्या ऐवजी पाईपलाईनच्या माध्यमातून गॅसचा वापर करावा, यासाठी सरकारने हा निर्णय घेतला आहे.

### ● रोड रिस्टोरेसन चार्जेस माफ करण्याचे निर्देश

या निर्णयाची अंमलबजावणी करण्यासाठी केंद्र सरकारने सर्वच राज्यांना पत्र लिहिले आहे. पाईपलाईनशी संबंधित जेवढी प्रकरणे प्रलंबित आहेत, तेवढी लवकरात लवकर मार्गी काढावी, पीएनजीची मागणी करणाऱ्या अर्जांना लवकरात लवकर मंजुरी द्यावी, असे निर्देश सरकारने दिले आहेत. ही प्रक्रिया लवकरात लवकर पूर्ण व्हावी यासाठी सरकारने रोड रिस्टोरेशन चार्ज (रस्त्यावर खोदकाम केल्यानंतर तो पुन्हा बुजण्यासाठी लागणारा खर्च) माफ करावा, ▶▶ उर्वरित पान २ वर

## एथेनॉल प्रकल्पांसाठी व्याज अनुदान योजना वाढवा

### ● खा. बजरंग सोनवणे यांनी घेतली केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, केंद्रीय मंत्री प्रल्हाद जोशी यांची भेट



**नवी दिल्ली**

बीडचे खा.बजरंग सोनवणे यांनी नवी दिल्ली येथे केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, केंद्रीय अन्न व सार्वजनिक वितरण मंत्री प्रल्हाद जोशी यांची भेट घेऊन एथेनॉल प्रकल्पांसाठी केंद्र सरकारच्या व्याज अनुदान योजना - २०१८ संदर्भातील विविध प्रलंबित प्रश्नांकडे लक्ष वेधले. या भेटीदरम्यान पुणे येथील वेस्ट इंडियन शुगर मिल्स असोसिएशन यांच्या निवेदनाच्या आधारे साखर उद्योगासमोरील अडचणी मांडण्यात आल्या. देशात इथेनॉल मिश्रण कार्यक्रम (ए-२०) यशस्वी करण्यासाठी साखर उद्योगाने मोठे योगदान दिले असून, एथेनॉल प्रकल्पांमध्ये सुमारे ४० हजार कोटी रुपयांची गुंतवणूक झाली आहे. त्यामध्ये महाराष्ट्राचा सुमारे ४० टक्के वाटा असल्याचे खा. सोनवणे यांनी नमूद केले. व्याज अनुदान योजनेअंतर्गत अनेक साखर कारखान्यांना दोन वर्षांहून अधिक कालावधी उलटूनही अनुदानाची रक्कम मिळालेली नाही, याकडे त्यांनी गृहमंत्र्यांचे लक्ष वेधले. बँकांनी ▶▶ उर्वरित पान २ वर

## महाराष्ट्रावर अवकाळी पावसाचं संकट, मुंबईत गुढीपाडव्याला हलक्या सरींची शक्यता; मराठवाडा, विदर्भात 'यलो अलर्ट'

**मुंबई । प्रतिनिधी**

दोन प्रत्यावर्ती चक्रीय वातस्थितीदरम्यान असलेल्या वारा खंडितता प्रणालीमुळे महाराष्ट्रामध्ये अवकाळी पावसाचे वातावरण निर्माण झाले आहे. याचा परिणाम मुंबईवर फारसा होणार नाही, अशी शक्यता वाटत असताना बुधवारी आणि गुरूवारी गुढीपाडव्याच्या दिवशी मुंबईत हलक्या सरींची शक्यता वर्तवण्यात आली आहे. केवळ मुंबईच नाही तर ठाणे, पालघर येथे मेघगर्जनेसह हलक्या सरी पडू शकतील. त्यामुळे गुढीपाडव्याच्या शोभायात्रांवर पाऊस किती परिणाम करणार याची चिंता निर्माण झाली आहे. राज्यभरात निर्माण झालेल्या ▶▶ उर्वरित पान २ वर

## पिंपळनेर सर्कल मध्ये परमेश्वर सातपुतेंनी इफ्तार पार्टी देऊन...

## सर्वधर्मसमभाव एकीचे दर्शन घडून आणले





**बीड । प्रतिनिधी**

पवित्र रमजान महिन्याच्या निमित्ताने शिवसेना माजी जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते सर यांच्या वतीने पिंपळनेर येथे भव्य दावत-ए-इफ्तार कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या माध्यमातून पिंपळनेर परिसरातील हिंदू-मुस्लिम बांधवांनी एकत्र येत सामाजिक ऐक्य, बंधुभाव आणि सलोख्याचा एक आदर्श संदेश दिला. इस्लाम धर्मात रमजान हा अत्यंत पवित्र आणि इबादतीचा महिना मानला जातो. या संपूर्ण महिन्यात मुस्लिम बांधव कडक उपवास (रोझा) ठेवून अल्लाहची भक्ती करतात. हा महिना केवळ उपवासापुरता मर्यादित नसून संयम, शुद्ध आचरण आणि गरजू-गरिबांना मदत करण्याची (जकात) शिकवण देणारा पवित्र काळ आहे. याच उदात्त भावनेतून पिंपळनेर येथे सर्वधर्मीय बांधवांसाठी या इफ्तार मेजवानीचे आयोजन करण्यात आले होते. या इफ्तार पार्टीत प्रमुख अतिथी म्हणून माजी आमदार सय्यद सलीम भाई, युवा नेते रोहित भैय्या पंडित, माजी जिल्हाप्रमुख कुंडलिक बापू खांडे,युवा नेते यशराज भैय्या पंडित,एम.आय.एम.चे बीड जिल्हाध्यक्ष शेख शफीक भाऊ, पिंपळनेर पोलीस स्टेशन चे ए.पी.आय मधुसुदन घुगे सर तसेच काँग्रेसचे तालुकाध्यक्ष गणेश दादा बजगुडे,पी. एस.आय गर्जे आप्पा यांची उपस्थिती होती. या कार्यक्रमाला पिंपळनेर सर्कलमधील सर्व समाजघटकांतील नागरिकांनी मोठ्या संख्येने हजेरी लावली. विशेष म्हणजे मुस्लिम ▶▶ उर्वरित पान २ वर



# गुढीला साडीशिवाय कोणते वस्त्र नेसवु शकतो?

# गुढीची साडी निसटू नये यासाठी कशी बांधावी....

गुढीला भरजरी पारंपरिक साडी नेसवून दारात उभारली जाते. गुढीचे सौंदर्य तिच्या वस्त्रात असते आणि या वस्त्राला धार्मिक महत्व प्राप्त आहे. त्यामुळे गुढीला नेसवले जाणारे वस्त्र व साडी महत्वपूर्ण मानली जाते. गुढी म्हंटले की डोळ्यासमोर आपसूकच साडीतील सुंदर गुढी दिसू लागते. मात्र साडीशिवाय देखील गुढीला इतर वस्त्र आपण नेसवु शकतो. त्या वस्त्रांना देखील शास्त्रीय महत्व आहे. त्यामुळे केवळ साडीच नाही तर इतर वस्त्र सुद्धा तुम्ही झटपट गुढीला बांधून ती उभारू शकता. तसेच साडी बांधताना ती खाली निसटायची भीती असते. काही साड्या भरजरी असल्याने त्या व्यवस्थित गुढीच्या काठीवर बसत नाहीत अशावेळी गुढीला साडी कशी नेसवावी हे आपण जाणून घेऊयात.

गुढीला साडी नेसवताना ती नवीन असावी लागते. गुढीला आपण मांगल्याचे प्रतीक मानतो त्यामुळे नववर्षाची सुरुवात करताना गुढीला नवीन वस्त्र,साडी नेसवावी. गुढीची साडी निवडताना ती पारंपरिक निवडली जाते. भरजरी साडी,पैठणी किंवा काठापदराच्या साड्या गुढीला नेसवण्यासाठी निवडतात. या सर्व साड्या वजनाने थोड्या हेवी असतात. त्या काठीवर अनेकदा व्यावस्थित बसत नाहीत.गुढीची साडी



निसटण्याची भीती असते. असे होऊ नये यासाठी तुम्ही एक मजबूत काठी किंवा बांबू गुढी उभारण्यासाठी घ्यावा त्यावर साडी दुकानात जशी एकत्र गोळा करून लावली जाते कशाप्रकारे साडी हातात एकत्र करून घ्यावी व ती काठीवर टाकून घट्ट दोरा अथवा सुतळीच्या साहाय्याने साडीला काठीवर व्यवस्थित बांधून घ्यावे. तुम्ही साडीच्या निऱ्या न करता देखील साडी गुढीला अशाप्रकारे नेसवु शकता. ही साडी सुंदर दिसते शिवाय खाली निसटण्याची भीती नसते.

गुढीला कोणते वस्त्र नेसवावे

गुढीला साडी नेसवण्याची परंपरा आहे मात्र साडीशिवाय गुढीला पारंपरिक काही वस्त्र देखील आपण नेसवु शकतो. या वस्त्रांना सुद्धा तितकेच धार्मिक महत्व प्राप्त आहे. अनेकांना कामाच्या गडबडीत साडी नेसवणे शक्य होत नाही किंवा अनेकांना गुढीला साडी नेसवणे जमत नाही. अशावेळी तुम्ही गुढीसाठी काही इतर पारंपरिक वस्त्र निवडू शकता. ही वस्त्र गुढीला झटपट लावून ती दारात शुभ मुहूर्तावर उभारू शकता. पाहुयात कोणती आहेत ही वस्त्र.

खण : गुढीला तुम्ही साडी नेसवणेशक्य नसेल तर पारंपरिक खणाचा ब्लाऊजपीस नेसवु शकता. हा खण निवडताना तो नवीन असावा तसेच त्याचा रंग हा खुलणारा असावा. काळा किंवा एकदम गडद रंगाचा खण घेऊ नये. तुम्ही जर गुढीला खण नेसवणार असाल तर त्यासाठी बारीक काठी घ्यावी व हा खण तुम्ही अतिशय आरामात काठीला लावून त्यावर तांब्याचा लोटा गुढीला लावून तुम्ही गुढी उभारु शकता.

शाल : गुढीला तुम्ही रेशमी शाल सुद्धा नेसवु शकता. ही शाल नवीन असावी. शाल निवडताना ती मऊ व चांगल्या दर्जाच्या कपड्याची असावी. रेशमी शाल किंवा कोणत्याही कपड्याची शाल घेत असाल तर कापड जास्त जाड असू नये याची काळजी घ्या. शालीचा रंग गडद नसावा. हलका गुलाबी किंवा कोणत्याही प्रसन्न रंगाची शाल गुढीला लावण्यासाठी तुम्ही घेऊ शकता.

पंचा : काहीजण गुढीला पंचा देखील लावतात. हे एक सुती वस्त्र असते. अनेकदा पंचा धार्मिक कार्यात वापरतात. पंचा सुती असल्याने तो हलका असतो. तसेच तुम्ही केशरी,लाल,पिवळा,पांढऱ्या रंगाचा पंचा गुढीसाठी वापरू शकता.

रुमाल : रुमाल फारसा कोणी गुढीसाठी वापरत नाही. मात्र काही लोक गुढीला रुमाल सुद्धा लावतात. तुमच्याकडे जर गुढीला रुमाल लावण्याची पद्धत असेल तर तुम्ही कोणत्याही हलक्या रंगाचा रुमाल गुढीला लावू शकता.

# पाणी वाचवा !

फेब्रुवारी महिन्याच्या अखेरीपासूनच यंदा उन्हाच्या झळा अनुभवायला येऊ लागल्या आहेत. यापूर्वी कधीही न अनुभवलेला उकाडा यंदा राज्यासह देशभरातील नागरिकांना भोगावा लागणार असल्याचा अंदाज वर्तवला जात आहे. उन्हाळ्याच्या दिवसांत पाण्याची मोठ्या प्रमाणात गरज भासते आणि याच दिवसांत नद्या, तळी, विहिरी कोरड्या पडू लागतात. ज्याचा परिणाम मानवी जीवनावर तर होतोच शिवाय पशु-पक्ष्यांचेही जीवनमान धोक्यात येते. आगामी काळात जगायचे असेल, तर आज पाण्याची बचत करणे अनिवार्य झाले आहे. बऱ्याचदा शेजारी पाजारी अन्य कोणी पाण्याची बचत करताना दिसत नाहीत, मग मीच का पाणी वाचवावे, असे विचार मनात येतात: मात्र शेजारची व्यक्ती पैशाची उधलपट्टी करते म्हणून त्याचे पाहून आपण ती करत नाही, कारण पैशाचे महत्व, पैसे वाचवण्याचे महत्व, पैसे कमावण्यासाठी लागणारी मेहेनत याबाबतची आपल्या प्रत्येकाला आहे. आज पाणी सहज उपलब्ध होत आहे याचा अर्थ भविष्यातही ते सहज उपलब्ध होईलच असे नाही. त्यामुळे पाण्याच्या बचतीचे महत्वही आपण लक्षात घ्यायला हवे. आपल्या लहान सहान कृतीतून पाण्याची बचत आपल्याला करता येते. पाणी वाचवणे म्हणजे अस्वछ राहणे असे मुळीच नव्हे,आपल्या दैनंदिन स्वच्छतेसाठी उदा. आंघोळ, तोंड धुणे, हात धुणे आणि अन्य स्वच्छतेसाठी किती पाणी आपण व्यय करतो हें प्रत्येकाला ज्ञात असते. त्यामध्येही उन्हाळ्यात जर आपण शॉवरचा वापर करत असू तर बादलीचा वापर करून कित्येक लिटर पाणी आपण वाचवू शकतो, हात धुताना हाताला हँडवॉश अथवा साबण लावेपर्यंत आपण नळ चालूच ठेवत असू तर तो बंद करायला हवा. कपडे आणि भांडी धुतांनाही हाच नियम पाळूया. भांड्यांना साबण लावताना नळ बंद ठेवूया. पिण्यासाठी आवश्यक तेव्हढेच पाणी घेऊया, जेणेकरून पाणी पिऊन झाल्यानंतर पेल्यात उरलेले पाणी अन्यत्र टाकावे लागणार नाही. कपडे धुण्यासाठी आणि भांडी घासण्यासाठी शक्य असल्यास काही दिवस यंत्राचा वापर न करता हाताने धुण्याचा प्रयत्न करूया. घरातील एखादा नळ बिघाड झाल्याने त्यातून पाणी गळत असेल, तर तो तत्परतेने दुरुस्त करून घेऊया. झाडांना आवश्यक तेव्हढेच पाणी देऊया. एखाद्या ठिकाणी पाईपलाईनमधून पाण्याची गळती होत असेल तर त्वरित पाणी खात्याला कळवून त्या ठिकाणी दुरुस्ती करून घेऊया. पाणी वाचवण्याचे महत्व आपल्या घरातील लहानग्यांनाही सांगुया. आपण जर सोसायटीत राहत असू तर सोसायटीची मिटिंग घेऊन पाणी वाचवण्याचे प्रयत्न सामूहिकपणे करण्याचा प्रयत्न करूया ! पाण्याला जीवन असे म्हटले जाते. फाईव्ह स्टार हॉटेलमध्ये महागडे जेवण जेवल्यानंतरही ते पचण्यासाठी जेवणांनंतर किमान ग्लासभर पाणी तरी आपल्याला हवेच असते. पाण्याविना जीवनाची आपण कल्पनाही करू शकत नाही. काही देशांमध्ये पाणीटंचाईमुळे इंधनाच्या दरात पाणी विकले जात असल्याच्या बातम्या आजवर आपण वाचल्या आहेत. आज आपण पाणी नाही वाचवले तर भविष्यात भारततही अशीच परिस्थिती निर्माण होऊ शकते. त्यासाठी पाणी वाचवण्याची सवय आतापासून अंगवळणी पाडूया !

–जगन घाणेकर,

◆ पान १ वरून पुढे...

## गॅसचं संकट मिटणार, ...

असेही आवाहन केंद्र सरकारने राज्य सरकारांना केले आहे. त्यामुळे आता लोकांना लवकरात लवकर पीएनजी कनेक्शन मिळणार आहे. नोडल अधिकारी नियुक्त करण्याचा आदेश- या निर्णयाची अंमलबजावणी प्रभावीपणे व्हावी यासाठी प्रत्येक राज्यात एक नोडल अधिकारी नियुक्त करण्याचेही आदेश केंद्र सरकारने दिले आहे. दरम्यान, सरकारने घेतलेल्या या निर्णयाचा फायदा देशभराती लोकांना होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. सध्यातरी गॅस सिलिंडरच्या विक्रीचा होणार काळाबाजार रोखण्याचे सरकारपुढे मोठे आव्हान आहे.

## एथेनॉल प्रकल्पांसाठी...

कर्जावरील व्याजाची वसुली केलेली असतानाही संबंधित अनुदान प्रलंबित असल्यामुळे साखर उद्योग आर्थिक अडचणीत सापडल्याचे त्यांनी स्पष्ट केले. तसेच, गेल्या सहा वर्षांपासून साखरेचा किमान आधारभूत दर (एमएसपी) स्थिर असून ऊस उत्पादकांना एफआरपीची रक्कम १४ दिवसांत देण्याची सक्ती असल्याने साखर कारखान्यांवर आर्थिक ताण वाढत आहे. महाराष्ट्रातील एफआरपी थकबाकी सुमारे ५ हजार कोटी रुपयांवर पोहोचल्याचेही त्यांनी निदर्शनास आणून दिले. दरम्यान, व्याज अनुदान योजना - २०१८ ची मुदत वाढविणे तसेच प्रलंबित अनुदान तातडीने मंजूर करणे, अशी मागणी खा. सोनवणे यांनी गृहमंत्री अमित शाह, केंद्रीय अन्न व सार्वजनिक वितरण मंत्री प्रल्हाद जोशी यांच्याकडे केली. यावर गृहमंत्री अमित शाह यांनी विषयाची सकारात्मक दखल घेत संबंधित मंत्रालयाशी चर्चा करून योग्य ती कार्यवाही करण्याचे आश्वासन दिल्याची माहिती खा. सोनवणे यांनी दिली.

## महाराष्ट्रावर अवकाळी....

पावसाळी वातावरणामुळे मुंबईचे कमाल तापमान कमी झाले आहे. मुंबईमध्ये कुलाबा येथे ३२.६ तर सांताक्रूझ येथे ३१.७ अंश सेल्सिअस कमाल तापमानाची नोंद झाली. सांताक्रूझ येथे कमाल तापमान १.५

◆ पान १ वरून पुढे...

अंशांनी खाली उतरले होते. आर्द्रतेमुळे किमान तापमानाचा पारा मात्र चढा आहे. कुलाबा येथे २५.५ तर सांताक्रूझ येथे २३ अंश सेल्सिअस किमान तापमानाची नोंद झाली. हे तापमान सरासरीपेक्षा अनुक्रमे २.८ आणि २.१ अंशांनी अधिक होते. कोकण विभागात मंगळवारी कोरडे वातावरण असेल मात्र त्यानंतर अवकाळी पाऊस उपस्थिती लावेल. रायगड, रत्नागिरी या जिल्ह्यांना मंगळवारी यलो लर्ट देण्यात आला आहे. रत्नागिरीला गुरुवारीही यलो लर्ट असून या काळात मेघगर्जनेसह विजांचा कडकडाट आणि वाऱ्यांचा वाढलेला वेग स्थानिकांना जाणवू शकेल. सिंधुदुर्ग जिल्ह्यात हलका पाऊस आणि मेघगर्जनेचा अंदाज आहे. मराठवाडा, विदर्भात 'यलो अलर्ट'- गुढीपाडव्यादिवशी मध्य महाराष्ट्र, मराठवाडा तसेच विदर्भातही यलो लर्ट आहे. विदर्भात अनेक ठिकाणी यलो लर्ट देण्यात आला असून या भागात तुरळक ठिकाणी मेघगर्जनेसह पाऊस पडत आहे. मराठवाड्यात परभणी, बीड, हिंगोली, नांदेड, लातूर, धाराशीव येथे यलो लर्ट आहे. धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक, कोल्हापूर येथे गुढीपाडव्याला मेघगर्जनेसह पावसाचा अंदाज आहे. तर अहिल्यानगर, पुणे, सातारा, सांगली येथे बुधवार आणि गुरुवारी मेघगर्जनेसह पावसाचा इशारा देण्यात आला आहे. सोलापूरात गुरुवारपर्यंत तीनही दिवस मेघगर्जनेसह पाऊस पडण्याची शक्यता आहे.

## पिंपळनेर सर्कल....

बांधवांसोबतच हिंदू बांधवांनीही सहभाग नोंदवत इफ्तारचा आनंद घेतला. यावेळी माझे सर्व सहकारी विविध राजकीय पक्षांचे प्रमुख पदाधिकारी, पिंपळनेर सर्कलमधील कार्यकर्ते, तसेच परिसरातील अनेक गावांचे सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य व पिंपळनेर ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.. इफ्तार पार्टी यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी मोलाचे सहकार्य आणि योगदान देणाऱ्या माझ्या सर्व हिंदू-मुस्लिम सहकारी मित्रांचे मन:पूर्वक आभार व्यक्त करतो. आपल्या सर्वांच्या एकजुटीमुळे, प्रेमभावनेमुळे आणि सामाजिक सलोख्यामुळे हा कार्यक्रम अत्यंत सुंदर व यशस्वीरीत्या पार पडला. भविष्यातही अशीच एकता आणि सहकार्य कायम राहो, हीच अपेक्षा.

◆ पान ४ वरून पुढे...

## छत्रपती शिवाजी....

उपाधीक्षक भूमिअभिलेख अनिल शिवणकर , आरोग्य निरीक्षक अशोक लोखंडे , राज्य परिवहन महामंडळाचे पंकज गोरे , तलाठी मंडळ अधिकारी संघटनेचे जिल्हाध्यक्ष पुरुषोत्तम आंधळे , महादेव चौरे , दादासाहेब शेळके तसेच बीड तालुक्यातील सर्व महसूल मंडळ अधिकारी , ग्राम महसूल अधिकारी , महसूल सेवक आणि तहसील कार्यालयातील कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. पेंडगाव महसूल मंडळातील १४ गावांतील सरपंच , उपसरपंच , पोलीस पाटील , ग्रामपंचायत सदस्य , माजी जिल्हा परिषद सदस्य , माजी पंचायत समिती सदस्य तसेच महिला बचत गट , शेतकरी गट आणि ग्रामस्थांनी मोठ्या प्रमाणात सहभाग नोंदविला . नागरिकांच्या मोठ्या उपस्थितीमुळे कार्यक्रमाला खऱ्या अर्थाने लोकाभिमुख स्वरूप प्राप्त झाले. शिबिरामध्ये विविध विभागांचे माहितीपर स्टॉल उभारण्यात आले होते . महसूल विभागाशी संबंधित जमीन नोंदणी , खातेफोड , वारस नोंद , सातबारा उतारे , विविध दाखले व प्रमाणपत्रे तसेच शासनाच्या विविध योजनांची माहिती नागरिकांना देण्यात आली . नागरिकांनी आपल्या अडचणी मांडल्या आणि संबंधित अधिकाऱ्यांनी त्यांना त्वरित मार्गदर्शन केले. या शिबिरामध्ये महसूल विभागाच्या विविध सेवांचा प्रत्यक्ष लाभ नागरिकांना देण्यात आला . यामध्ये जिवंत सातबारा, डिजिटल सातबारा वाटप , वारस फेरफार , वर्ग १ ते वर्ग २ रूपांतर, ई पिक पाहणी, ग्रीस्टॅक नोंदणी, ई वसुली पावती , सेवामित्र प्रमाणपत्र, प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र , पानंद रस्ते योजना, रस्त्यांच्या नोंदी सातबारा उताऱ्यावर घेणे, ई केवायसी प्रक्रिया , आधार कॅम्प, ई शिधापत्रिका वाटप, लक्ष्मी मुक्ती योजना लाभ, रक्तदान शिबिर , अभिलेख दुरुस्ती , मोफत आरोग्य तपासणी, घरकुल मंजुरी आदेश , गायरान मंजुरी आदेश तसेच मागेल त्याला शेततळे योजना याबाबत नागरिकांना सविस्तर माहिती देण्यात आली . शिबिरात विविध सेवा मोठ्या प्रमाणावर देण्यात आल्या . त्यामध्ये १८०० डिजिटल सातबारा उताऱ्यांचे वाटप करण्यात आले . १३० डिजिटल शिधापत्रिकांचे वितरण करण्यात आले . महसूल विभागाशी संबंधित १२० फेरफार प्रकरणांचा निपटारा करण्यात आला . विविध योजनांअंतर्गत १०५ प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले . ३० आयुष्यमान भारत कार्डचे वाटप करण्यात आले तसेच १३० नागरिकांची मोफत आरोग्य तपासणी करण्यात आली. संजय गांधी निराधार योजना आणि श्रावण बाळ योजना लाभार्थ्यांसाठी शिबिरात विशेष सुविधा उपलब्ध करून देण्यात आली होती . लाभार्थ्यांचे हयात प्रमाणपत्र ऑनलाईन करून देण्यात आल्यामुळे अनेक ज्येष्ठ नागरिकांना मोठा दिलासा मिळाला. या शिबिरामुळे महसूल विभागाच्या सेवा नागरिकांच्या दारी उपलब्ध झाल्याने नागरिकांनी समाधान व्यक्त केले . अनेक शेतकरी आणि ग्रामस्थांनी प्रशासनाशी थेट संवाद साधत आपल्या समस्या मांडल्या . अधिकाऱ्यांनी त्या समस्यांवर मार्गदर्शन करून काही प्रकरणे जागेवरच निकाली काढली . त्यामुळे नागरिकांना तालुका कार्यालयाच्या वारंवार फेऱ्या मारण्याची आवश्यकता भासली नाही. यावेळी बोलताना तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी नमूद केले की , शासनामार्फत सुरू करण्यात आलेले हे अभियान नागरिकांच्या हितासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे . प्रशासन नागरिकांच्या सर्व समस्यांचे निराकरण करण्यासाठी कटिबद्ध आहे . कोणताही सर्वसामान्य नागरिक आपली समस्या थेट मांडू शकतो आणि त्यावर योग्य तो तोडगा काढला जाईल , असे त्यांनी स्पष्ट केले. कार्यक्रमादरम्यान उपस्थित मान्यवरांनी नागरिकांना शासनाच्या विविध योजनांचा लाभ घेण्याचे आवाहन केले . प्रशासन आणि नागरिक यांच्यातील संवाद अधिक मजबूत करण्यासाठी अशा शिबिरांचे मोठे महत्त्व असल्याचे त्यांनी नमूद केले . छत्रपती शिवाजी महाराजांच्या लोकाभिमुख प्रशासनाच्या विचारांची प्रचीती या अभियानातून येत असल्याचे यावेळी अधोरेखित करण्यात आले . या शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी मंडळ अधिकारी अंगद काशीद तसेच ग्राम महसूल अधिकारी विकास ससाने , दादासाहेब शेळके , विलास तपसे , आप्पासाहेब पवार आणि गणेश गायकवाड यांनी विशेष परिश्रम घेतले . एकूणच छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान अंतर्गत आयोजित करण्यात आलेले हे शिबिर प्रशासनाच्या लोकाभिमुख कार्यपद्धतीचे प्रभावी उदाहरण ठरले . नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद , विविध विभागांचा समन्वय आणि प्रशासनाची तत्परता यामुळे हे शिबिर यशस्वीपणे पार पडले . शासनाच्या योजना तळागाळापर्यंत पोहोचविण्यासाठी अशा शिबिरांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असल्याची भावना उपस्थित नागरिकांनी व्यक्त केली .

## स्नेह मेळाव्यातून....

श्रीमती मुळे, श्रीमती खेडकर यांची उपस्थिती होती. पुढे बोलताना डॉ. अजयदादा धोंडे यांनी सांगितले की, प्रत्येक वर्षी असे कार्यक्रम ठेवावेत. या कार्यक्रमास सर्व सेवा निवृत्त कर्मचारी यांनी वेळात वेळ काढून उपस्थित रहावे. कार्यक्रमामधून एकमेकांचे सुखदु:ख समजते तसेच विचारांची देवाण-घेवाण केली जाते. त्याचप्रमाणे ज्येष्ठ शिक्षकांनी संस्थेला काही अत्यावश्यक अशा मार्गदर्शक सूचना कराव्यात. कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना आयोजक व संस्थेचे प्रशासकीय अधिकारी डॉ. डी. बी. राऊत यांनी सांगितले की, गोरगरिबांच्या मुलांना शिक्षणाची सोय होईल यासाठी संस्था अध्यक्ष व माजी आ. भीमराव धोंडे यांनी गावागावात शाळा सुरू केल्या. आतापर्यंत संस्थेचे १७२ कर्मचारी सेवानिवृत्त झाले आहेत. सेवानिवृत्तीनंतर गाठीभेटी होणे अवघड होते. सेवानिवृत्तीनंतर स्वत: साठी जगा असे डॉ. राऊत त्यांनी सांगितले.आपण एकत्र आलो आहोत. एकमेकांच्या गाठीभेटी होण्यासाठीच सर्वांच्या प्रेरणेने हा मेळावा आयोजित करण्यात आला आहे. यावेळी सेवानिवृत्त मयत कर्मचाऱ्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. यावेळी हभप मगर महाराज, शहाबुद्दीन सय्यद, बाबासाहेब झगडे, शिवाजी वनवे, महादेव दानवे, सुनिल शिंदे, जगताप, आडसरे महाराज,औटे, खेडकर,गाडे के.बी., शेख शब्बीर, प्रा. मंडलिक, संजय गावडे व इतरांची भाषणे झाली. सुत्रसंचलन गंगाधर बोराडे यांनी केले. उपस्थितांचे आभार भीमराव आहेर यांनी मानले.

## कांदा काढणी जोरात....

४०० ते ५०० रुपये मजुरी द्यावी लागत असल्याचे शेतकरी सांगतात. काही ठिकाणी कामाच्या प्रमाणानुसार पोते भरणे किंवा कांदा गोळा करण्याच्या हिशेबानेही मजुरी दिली जात आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचा खर्च आणखी वाढला आहे. कांद्याचे उत्पादन चांगले आले आहे, पण बाजारभाव खूपच कमी आहेत. खत, औषधे, मजुरी आणि वाहतूक खर्च वाढला आहे. या दरात कांदा विकल्यास खर्चही निघणे कठीण आहे, असे पिंपळनेर येथील शेतकरी बळीराम मेहेत्रे यांनी सांगितले. रंजेगाव येथील शेतकरी बळीराम तायड म्हणाले, कांदा काढणीसाठी मजुरांना जास्त मजुरी द्यावी लागते. त्यात वाहतूक खर्च वाढल्यामुळे शेतकऱ्यांना आर्थिक ताण सहन करावा लागत आहे. कांदा काढणीचे काम कष्टाचे असल्याने मजुरी योग्य असल्याचे मजूर सांगतात. दिवसभर उन्हात काम करावे लागते. त्यामुळे मजुरी थोडी वाढली असली तरी ती कष्टाच्या मानानेच आहे, असे सांडरवन फाटा परिसरातील मजूर रामभाऊ भोसले यांनी सांगितले. भाववाढीची अपेक्षा- सध्या शेतकरी कांदा काढून साठवणुकीकडे वळत असून, पुढील काही दिवसांत बाजारभाव वाढतील, अशी आशा व्यक्त केली जात आहे. मात्र, दरात सुधारणा झाली नाही तर शेतकऱ्यांना मोठे आर्थिक नुकसान सहन करावे लागेल, अशी चिंता व्यक्त होत आहे.

## पालकांसाठी आनंदवार्ता! ....

तसेच १६ मार्च २०२६ पर्यंत ज्या पालकांनी आरटीई २५ टक्के प्रवेशासाठी ऑनलाइन अर्ज भरले आहेत, त्यांना अर्ज 'अनकन्फर्म' करून पुन्हा 'कन्फर्म' करण्याची सुविधा पोर्टलवर उपलब्ध करून देण्यात येणार आहे. यासाठी संबंधित पालकांना पोर्टलवर पॉप-अप विंडोच्या माध्यमातून सूचना देण्यात येणार आहे. दरम्यान, न्यायालयाच्या आदेशानुसार सुधारित नियम लागू करत ऑनलाइन प्रवेश प्रक्रिया तातडीने सुरू ठेवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. त्यामुळे आता अधिक अंतरावरील शाळांचे पर्याय उपलब्ध झाल्याने आरटीई प्रवेशासाठी अर्ज करणाऱ्या पालकांना मोठा दिलासा मिळणार आहे. त्याचबरोबर अगोदर दाखल केलेले विद्यार्थ्यांना अर्ज अपडेट करता येणार असल्याची माहिती मनोज जाधव यांनी दिली आहे. अशी संपूर्ण प्रक्रिया असताना आरटीई पोर्टलवर शाळांचे लोकेशन चुकीच्या पद्धतीने कसे अपलोड झाले, यामागे शाळा प्रशासन की शिक्षण विभाग दोषी आहे, याची चौकशी होणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. तसेच संबंधित शाळांमध्ये आतापर्यंत दाखल झालेले अर्ज अनकन्फर्म करून नव्याने योग्य लोकेशन नोंदवून पुन्हा अर्ज मागवावेत, अशी मागणीही मनोज जाधव यांनी केली आहे.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed ( Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com
हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक - दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# श्रीक्षेत्र संतकृपा हनुमानगड येथे श्रीरामनवमी निमित्त भव्य दिव्य अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन

**आष्टी । प्रतिनिधी**

श्रीक्षेत्र संतकृपा हनुमानगड, सावरगाव (घाट) येथे श्रीरामनवमी निमित्त भव्य दिव्य अखंड हरिनाम सप्ताह व श्रीमद्भागवत कथा महायज्ञ कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून, यानिमित्ताने अखंड हरिनाम सप्ताह व विविध धार्मिक, आध्यात्मिक उपक्रमांनी परिसर भक्तिमय वातावरणात न्हाऊन निघणार आहे.या महोत्सवाची सुरुवात दिनांक १९ मार्चपासून होणार असून, २७ मार्चपर्यंत विविध कीर्तन, प्रवचन, भजन, श्रीमद् भागवत कथा आयोजन करण्यात आले आहे. या कालावधीत नामवंत कीर्तनकार व प्रवचनकार आपली सेवा देणार आहेत. यामध्ये श्रीमद् भागवत कथा प्रवक्ते महंत अभिमन्यू महाराज शास्त्री यांची सुश्राव्य कथा संपन्न होणार आहे, कीर्तनकार ह.भ.प. परमेश्वर महाराज जायभाये, ह.भ.प. रोहिदास महाराज शास्त्री, ह.भ.प. सोपान महाराज शास्त्री सानप, ह.भ.प. शांतीगिरी महाराज चितळकर, ह.भ.प. माऊली महाराज कोडुळे, ह.भ.प.



काशिनाथ महाराज शास्त्री, ह.भ.प. कीर्तनकेसरी गहिनीनाथ महाराज खेडकर, ह.भ.प. युवाकीर्तनकार ज्ञानेश्वर म. भवर तसेच ह.भ.प. प्रकाश महाराज साठे यांचा समावेश आहे. दररोज सकाळी काकडा आरती, हरिनाम सप्ताह, धार्मिक विधी, तसेच सायंकाळी कीर्तन, प्रवचन व जागर कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. विविध क्षेत्रातील मान्यवर, संत-महंत, कीर्तनकार, सामाजिक व राजकीय व्यक्तींची उपस्थिती या सोहळ्यास लाभणार आहे. कार्यक्रमाच्या समारोपाच्या दिवशी म्हणजे २७ मार्च रोजी महंत श्री अभिमन्यु महाराज शास्त्री यांच्या प्रमुख उपस्थितीत काल्याचे कीर्तन होणार असून, त्यानंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. या धार्मिक सोहळ्यामुळे संपूर्ण परिसरात भक्तीमय व उत्साहपूर्ण वातावरण निर्माण झाले असून, भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या कार्यक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन महंत अभिमन्यू महाराज शास्त्री (श्री क्षेत्र हनुमानगड) यांनी केले आहे.

## विज्ञान प्रदर्शन स्पर्धेत डॉ.बाबासाहेब आंबेडकर विद्यालयाचा विद्यार्थी प्रद्युन्म घुलेला तृतीय पारितोषीक

**बीड । प्रतिनिधी**

ज्येष्ठ शिक्षक नेते स्व.द.बा घुमरे यांच्या जयंतीनिमित्त आयोजित जिल्हास्तरीय वक्तृत्व व विज्ञान प्रदर्शन स्पर्धा २०२६ प्रदर्शनामध्ये डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर विद्यालयाचा विद्यार्थी घुले प्रद्युम्न तृतीय पारितोषिक प्राप्त बीड येथील आनंद मागासवर्गीय शिक्षण प्रसारक मंडळ बीड संचलित डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यालयाचा विद्यार्थी चि. प्रद्युम्न श्रीहरी घुले या विद्यार्थ्याने बीड येथील द.बा. घुमरे



पब्लिक स्कूल या विद्यालयामध्ये आयोजित जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शनामध्ये तृतीय पारितोषिक प्राप्त केल्याबद्दल त्याचे आनंद मागासवर्गीय शिक्षण प्रसारक मंडळ बीड या संस्थेचे अध्यक्ष श्री. धुतालमल, सचिव ॲड. व्ही बी. मगर सर्व संचालक आणि या विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री. बी .ए .हावळे यांनी अभिनंदन केले असून पुढील यशासाठी शुभेच्छा दिल्या. चि. प्रद्युम्न श्रीहरी घुले या विद्यार्थ्यास सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र आणि २१०० रू पारितोषिक प्राप्त झाले आहे. या विद्यार्थ्याचे मार्गदर्शक विज्ञान शिक्षिका श्रीमती. एन .जी. मुंडे आणि श्री. डब्ल्यू .एस .वाघमारे यांनी अमूल्य मार्गदर्शन केले होते. या यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन आनंद छात्रालयाचे अधिक्षक श्री. डी .व्ही. खरसाडे, समर्थ गुरुकुल चे अधिक्षक श्री. रविराज घुले, विद्यालयाचे सर्व शिक्षक वृंद सर्व शिक्षक इतर कर्मचारी व पालक यांनी शुभेच्छा दिल्या आहेत.

## श्री युवा माहेश्वरी बीडच्या अध्यक्षपदी राजेश्वर तापडिया तर सचिवपदी विजय डागा यांची निवड

**बीड । प्रतिनिधी**





येथील श्री युवा माहेश्वरी संघटनेच्या अध्यक्षपदी राजेश्वर तापडिया यांची तर सचिवपदी विजय डागा यांची निवड करण्यात आली. एमआयडीसी भागात झालेल्या बैठकीत मान्यवरांच्या उपस्थितीत सर्वानुमते ही निवड करण्यात आली. या बैठकीस महाराष्ट्र प्रदेश माहेश्वरी युवा संघटनेचे माजी सहसचिव अमर सारडा, मावळते अध्यक्ष ऋषीकेश सोहनी, सचिव अनूप चरखा यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी निवडण्यात आलेल्या कार्यकारिणीत उपाध्यक्ष गोपाल लद्दड, कोषाध्यक्ष आशिष कासट, सहसचिव अजय डागा, संघटनमंत्री युवराज चरखा यांचा समावेश आहे. यावेळी संघटनेच्या वतीने आयोजीत करण्यात येणार्या रक्तदान शिबीर, सुंदरकांड, कुलदेवी प्रोजेक्ट, दांडिया यासह इतर उपक्रमांबाबत चर्चा करण्यात आली. बैठकीस युवा माहेश्वरीचे सदस्य मयुर कासट, संतोष तोष्णीवाल, नीरज सारडा, रोशन टवाणी, राहुल लोहीया, पंकज धूत, हेमंत बियाणी, संकेत टवाणी, पंकज भुतडा, कमलेश रांदड, सचिन लड्डा, महेश लड्डा, अमित मंत्री, शुभम सिकची, अमित बाहेती, अभिजित दोड़े, श्रीकांत बियाणी, आशिष चरखा, मयुर काबरा, प्रसाद रांदड, अजय लड्डा, अनिल लड्डा, ऋषीकेश मानधने, पवन भक्कड, संतोष सोमाणी, संकेत टवानी,आकाश चरखा, आनंद चांडक डॉ रमण बियानी, सीए न्यानेश चरखा, रुपेश मानधने, अनुज चरखा, महेश बियानी, संकेत तापडिया, सीए ऋषीकेश मूंदड़ा यांची उपस्थिती होती.

## आध्यात्मिक प्रगती, सकारात्मक जीवनशैली, समृद्धीचे रहस्य उलगडण्यासाठी बीडमध्ये 'कुबेर का खजाना' परिसंवादाचे आयोजन

### बीड जिल्ह्यासह शहरवासीयांनी लाभ घेण्याचे आयोजकांचे आवाहन

**बीड । प्रतिनिधी**

जीवनातील नकारात्मकता दूर करून यशाच्या शिखराकडे जाण्यासाठी बीड 'नारायण रेकी सत्संग' परिवाराच्यावतीने बीड जिल्हावासीयांसाठी एक प्रेरणादायी आध्यात्मिक सोहळा अयोजित करण्यात आला असून याचा बीड जिल्हा वासीयांनी लाभ घ्यावा असे आवाहन संयोजन समितीच्यावतीने करण्यात आले आहे.

बीड नारायण रेकी सत्संग परिवार, बीड यांच्या वतीने नारिरत्न आग्रशिरोमणी व जागतिक विक्रमादित्य जीवन परिवर्तन वक्ता श्रीमती राजेश्वरजी मोदी (राज दीदी) यांच्या मार्गदर्शनाखाली 'कुबेर का खजाना' या विशेष परिसंवादाचे आयोजन करण्यात आले आहे. या परिसंवादात राज दीदी त्यांच्या सुमधूर वाणीतून सकारात्मक विचार, आध्यात्मिक उन्नती तसेच जीवनात समृद्धी कशी साध्य करावी यावर त्या मार्गदर्शन करणार आहेत. हा परिसंवाद सोमवार, २३ मार्च २०२६ रोजी सकाळी ९.३० ते दुपारी १.०० या वेळेत आयोजित करण्यात आला आहे. शहरातील एम.आय.डी. सी.भागातील मॉ वैष्णो पॅलेस,या ठिकाणी हा विशेष परिसंवाद कार्यक्रम संपन्न होणार आहे. सदर परिसंवादासाठी नाममात्र शुल्क आकारण्यात आले असून कार्यक्रमाच्या नियोजनासाठी व यशस्वी अंमलबजावणीसाठी विविध समित्यांची स्थापना करण्यात आली आहे. प्रवेश प्रक्रियेसाठी सौ. सारिका अग्रवाल, सौ. शांता गिल्डा, सौ.सविता सारडा, सौ. मधु कोटेचा, सौ.सुनीता सारडा, सौ. अर्चना मुंदडा, सौ.अनुश्री लड्डा व सौ.अनुराधा लड्डा यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे. बीड जिल्ह्यासह शहर व परिसरातील जास्तीत जास्त नागरिकांनी या प्रेरणादायी परिसंवादाचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे. कार्यक्रमाचे संयोजन एन.आर.एस.पी. परिवार, बीड यांनी केले आहे.

# आदित्य कृषी च्या माजी विद्यार्थिनी डॉ. श्रद्धा एडके यांचा धाराशिवमध्ये "तेजस्विनी कन्या" म्हणून गौरव





**आमच्या संस्थेच्या विद्यार्थिनीने मिळवलेला हा सन्मान अत्यंत अभिमानास्पद आहे. आदित्य शिक्षण संस्था नेहमीच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर भर देते. अशा यशस्वी विद्यार्थ्यांमुळे संस्थेचे नाव अधिक उंचावत आहे. भविष्यातही असेच गुणवंत विद्यार्थी घडत राहतील. याचा आम्हाला विश्वास आहे. -डॉ. आदिती सारडा, संचालिका, आदित्य शिक्षण संस्था, बीड**

### आदित्य शिक्षण संस्थेच्या वतीने सत्कार

**बीड । प्रतिनिधी**

आदित्य शिक्षण संस्था, बीड यांच्या गुणवत्तापूर्ण शिक्षणाची परंपरा पुन्हा एकदा अधोरेखित झाली. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाचा गौरवही झाला. संस्थेच्या आदित्य कृषी शाखेच्या माजी विद्यार्थिनी डॉ. श्रद्धा संजयकुमार एडके यांना तेजस्विनी कन्या या प्रतिष्ठित सन्मानाने जागतिक महिला दिनानिमित्त गौरविण्यात आले. धाराशिव जिल्हा प्रशासनाच्या वतीने धाराशिवचे जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांच्या हस्ते त्यांचा सन्मान करण्यात आला. डॉ. श्रद्धा एडके यांच्या उतृष्ठ यशाबद्दल आदित्य शिक्षण संस्थेच्या वतीने संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्र सारडा, संचालिका डॉ. आदिती सारडा, संचालक डॉ. आदित्य सारडा यांच्या मार्गदर्शनाखाली संस्थेत एडके यांचा गौरव करण्यात आला. डॉ. श्रद्धा एडके यांनी आदित्य कृषी शाख, बीड येथे सन २०१३ ते २०१७ या कालावधीत बी.एस्सी. ॲग्रिकल्चर पदवीचे शिक्षण पूर्ण केले. त्यांनी वसंतराव नाईक कृषी विद्यापीठ, परभणी येथून पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केले. त्यांनी डॉ. बाळासाहेब सावंत कृषी विद्यापीठ, दापोली येथून पीएच. डी. पूर्ण केली. त्यांनी उद्यानविद्याशास्त्र विभागात भाजीपाला शास्त्र (व्हेजिटेबल सायन्स ) या विषयात संशोधन केले. पीएच.डी.मधील त्यांचे संशोधन कार्य उल्लेखनीय आहे. कोकण कृषी-हवामानिक परिस्थितीत पोल प्रकार डोलिचोस बीन्स यांचे संकलन व मूल्यांकन आणि आण्विक मार्कर्सद्वारे त्यांचा विविधता विश्लेषण या विषयावर त्यांनी संशोधन केले. त्यांनी वेलवर्गीय घेवडा या पिकाचा डी एन ए -आधारित जनुकीय अभ्यास केला. या कार्यामुळे त्यांनी कोकण कृषी विद्यापीठात नावलौकिक मिळवला. कृषी क्षेत्रातील विविध विषयांवर त्यांनी सखोल अभ्यास केला. त्यांनी संशोधनात्मक कार्यही केले. त्यांनी शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. त्यांनी आधुनिक तंत्रज्ञान, पीक व्यवस्थापन, उत्पादनवाढ, उत्पन्नवाढ याबाबत प्रभावी मदत केली. त्यांच्या कार्यामुळे अनेक शेतकऱ्यांना उत्पादनवाढीसह आर्थिक लाभ झाला. ग्रामीण भागातील शेतकऱ्यांच्या प्रगतीसाठी केलेल्या कार्याची दखल घेण्यात आली. त्यांना तेजस्विनी कन्या या सन्मानाने गौरविण्यात आले. या उल्लेखनीय यशाबद्दल आदित्य कृषी शाखा, बीड येथेही डॉ. श्रद्धा एडके यांचा सत्कार करण्यात आला. आदित्य शिक्षण संस्था, बीडच्या सन्माननीय संचालिका डॉ. आदिती सारडा यांच्या हस्ते हा सत्कार झाला. त्यांच्या भावी आयुष्यासाठी खूप खूप शुभेच्छा देण्यात आल्या. अशीच प्रगती करत राहा, असेही सांगण्यात आले. प्राचार्य श्याम भूतडा यांनी त्यांचे अभिनंदन केले. त्यांनी त्यांच्या कार्याचा गौरव केला. भविष्यातही कृषी क्षेत्रात अशीच उल्लेखनीय कामगिरी करत शेतकरी व समाजाच्या प्रगतीसाठी योगदान द्यावे, अशा शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थ्यांनीही डॉ. श्रद्धा एडके यांचे अभिनंदन केले. त्यांनी त्यांच्या यशाबद्दल आनंद व्यक्त केला. डॉ. श्रद्धा एडके यांचा हा सन्मान आदित्य कृषी शाखेच्या विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरत असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.


**जाहीर प्रगटन**

**मा. श्री. मा.ये. वाघ ५ वे दिवाणी न्यायाधीश व. स्तर, बीड, ता. जि. बीड यांच्या न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्र. १९१२/२०२५**
**केशरबाई मुळीक वि. निरंक**

ज्यापेक्षा भिमराव पि.गणपती शिंदे, हे दिनांक ११/०९/२०२५ रोजी बीड, ता.जि.बीड येथे मयत झालेली आहे, आणि तसेच अर्जदार-

**१. शोभा भ्र. भिमराव शिंदे, वय ४५ वर्षे, धंदा. घरकाम, रा. बजरंग नगर, कॅनॉल रोड, बीड, ता.जि. बीड.२. आकाश पि. भिमराव शिंदे, वय २९ वर्षे, धंदा. शिक्षण, रा. वरीलप्रमाणे, ३. दिपक पि. भिमा शिंदे, वय २८ वर्षे, धंदा शिक्षण, रा. वरीलप्रमाणे, ४. सौ. पायल भ्र. किरण कदम, वय २३ वर्षे, धंदा. घरकाम, रा. सौंदाण, ता. पाटोदा, जि. बीड**

अर्जदार क्र. १ ही मयताची पत्नी असुन, अर्जदार क्र. २ व ३ हे मयताचे मुले आहेत, अर्जदार क्र. ४ ही मयताची विवाहीत मुलगी आहे. या अर्जदारा व्यतिरिक्त मयतास इतर दुसरे कोणीही वारस नाहीत, असे वरील अर्जदारांचे म्हणणे आहे. वरील अर्जदार यांनी ते मयताचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र त्यांच्या हक्कात मिळण्यासाठी या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा सदरहु अर्जदार हे मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत, त्यांनी या कोर्टात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु कोर्ट, सदरहु अर्जदारांच्या हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन, त्यांचा/अर्जदारांचा हक्क शाबीत दिसल्यास, त्यांना / अर्जदारांना सदरहु मयत नामे भिमराव पि.गणपती शिंदे, यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात **येईल याची नोंद घ्यावी**

**प्रकरणाची पुढील तारीख २०/०४/२०२६ ही आहे.**

आज दिनांक १३ मार्च २०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

**(ॲड. मनिषा अ. गडकर यांचे मार्फत)**

**शिक्का** | **(स्वाक्षरीत) क. लिपीक** | **आदेशावरून (स्वाक्षरीत) अधिक्षक दिवाणी न्यायालय व. स्तर बीड**

**जाहीर प्रगटन**

**मा. श्री. ए. एम. फडतरे, ४ थे सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांच्या न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक ३३९/२०२६**

अर्जदार- **(१) अनुसया भ्र. गणेश बन्सड, वय-२६ वर्षे, धंदा- घरकाम, रा. मौजवाडी ता. जि. बीड. (२) श्रुती पि. गणेश बन्सड अ.पा.क आई अर्जदार क्र. १ वय ०५ वर्षे, रा. मौजवाडी ता. जि. बीड. ३) रूद्रा पि. गणेश बन्सड अ.पा. क आई अर्जदार क्र. १ वय-०३ वर्षे, रा. मौजवाडी ता. जि. बीड.**

गैरअर्जदार : निरंक

अर्जदार हे भारतीय आहेत

प्रकरण : बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदार यानी मयत नामे गणेश पि. लक्ष्मण बन्सड यांचे वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

मयत नामे गणेश पि. लक्ष्मण बन्सड, रा. मौजवाडी, ता. जि. बीड हे दिनांक २१/०१/२०२६ रोजी जिल्हा रूग्णालय, बीड येथे मयत झालेले आहेत. अर्जदार क. १ ही मयताची पत्नी असून अर्जदार क्र. २ ही मयताची मुलगी आहे. अर्जदार क. ३ हा मयताचा मुलगा आहे अर्जदार क्र. २ व ३ हे अज्ञान असून त्याची अज्ञान पालनकर्ती आई अर्जदार क १ ही आहे. अर्जदार यांच्याशिवाय मयताचे ईतर कोणीही वारस नाहीत. अर्जदाराचे असेही म्हणणे आहे की, शासकीय कामासाठी, कार्यालयीन उपयोगाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे म्हणून सदरचा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरील अर्जदार हे मयताचे वारस नाहीत असे कोणास समजावयाचे असेल तर त्यानी हे प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आत या न्यायालयात हजर होऊन आपली हरकत द्यावी. जर मुदतीत कोणीही हरकत न दिल्यास हे न्यायालय अर्जदाराचे हक्कात त्याचा हक्काबाबतचा पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्याना मयताचे वारस असल्याद्दलचे वारस प्रमाणपत्र दिले जाईल याची सर्वांनी नोंद घ्यावी. **पुढील दिनांक ३०/०३/२०२६**

आज दिनांक १३/०३/२०२६ रोजी न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**(ॲड. गडकर एम. ए.)**

**शिक्का** | **(स्वाक्षरीत) क. लिपीक** | **आदेशावरून (स्वाक्षरीत) अधिक्षक दिवाणी न्यायालय व. स्तर बीड**

**जाहीर प्रगटन**

**मा. दिवाणी न्यायधिश साहेब (क. स्तर) शिरुर कासार, यांचे न्यायालयात**
**कि.दि.अर्ज क्रमांक- ६५/२०२६**

अर्जदार :- **१) आशाबाई भ्र. पोपट कदम वय ७५ वर्षे, धंदा घरकाम व शेती, रा. राक्षसभुवन, ता.शिरुर कासार, जि. बीड. २) राम पि. पोपट कदम वय ५४ वर्षे, धंदा- शेती, रा. सदर, ३) ललिता पि. पोपट कदम वय ५२ वर्षे, धंदा घरकाम, रा. सदर, ४) संजय पि. पोपट कदम वय ५० वर्षे, धंदा- शेती, रा. सदर, ५) रंजीत पि. पोपट कदम वय ४७ वर्षे, धंदा- शेती, रा. सदर**

विरुध्द

गैरअर्जदार :- नील

अर्ज:- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ नुसार वारसाचे प्रमाणपत्र मिळणेबाबत.

ज्यापेक्षा मयत नामे पोपट पि. आप्पा कदम, रा. राक्षसभुवन, ता. शिरुर कासार, जि. बीड येथील रहीवशी असुन ते दिनांक - १२/१२/२०२५ रोजी मौजे राक्षसभुवन, ता. शिरुर कासार, जि. बीड येथे रहात्या घरी मयत झाले आहेत. अर्जदार क्र.१ ही मयताची पत्नि असुन, अर्जदार क्र. २, ४ व ५ हे मयताचे मुले असुन अर्जदार क्र. ३ ही मयताची मुलगी आहे. अर्जदार हेच मयताचे कायदेशीर वारस आहेत असा अर्ज केला आहे. त्यापेक्षा सदरंहु अर्जदार हे उपरोक्त मयत यांचे वारस नव्हेत असे कोणास समजविण्याचे असेल तर ह्या जाहिरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्याने मा. कोर्टात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की जर सदरहु मुदती कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सरदहु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु अपरोक्त मयत यांचे वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक- १६/०३/२०२६ रोजी माझे सहीने व नयायालयाच्या शिक्यानिशी दिले **सदर प्रकरणात पुढील तारीख २१/०४/२०२६ हि आहे.**

**(ॲड. एच. एस. कोठुळे)**

**शिक्का** | **(स्वाक्षरीत) क. लिपीक** | **आदेशावरून (स्वाक्षरीत) अधिक्षक दिवाणी न्यायालय क. स्तर शिरूर कासार**

**जाहीर प्रगटन**

**मा. माणिकराव रा. सातव ७वे सह. दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क. ३९०/२०२६**
**दिप्ती व इतर वि. निरंक**

अर्जदार- १ दिप्ती भ्र कुमार शिंदे, वय २८ वर्षे, धंदा घरकाम, रा. बोरखेड, ता. जि. बीड २. श्राव्या पि. कुमार शिंदे वय ०४ वर्षे, ३. अथर्व पि कुमार शिंदे, वय ०२ वर्षे -

अज्ञान अर्जदार कमांक २ व ३ करिता अ.पा.क. आई दिप्ती भ्र. कुमार शिंदे सर्व रा. बोरखेड, ता. जि. बीड. ४. लताबाई भ्र. दत्तात्रय शिंदे वय ७४ वर्षे, धंदा घरकाम, बोरखेड, ता जि. बीड, ५. दत्तत्रय पि. आनंदराव शिंदे वय ७८ वर्षे, धंदा शेती. रा. बोरखेड, ता. जि. बीड. विरुध्द

गैरअर्जदार- निरंक

मागणी बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात मयत कुमार दत्तात्रय शिंदे यांचे वारस असल्या बाबतचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. ज्याअर्थी

मयत कुमार दत्तात्रय शिदि हे दिनांक दि. ०५/०२/२०२६ मौजे बोरखेड, ता. जि. बीड येथे मयत झालेले असून अर्जदार मयत कुमार दत्तात्रय शिंदे यांचे वारस आहेत. वरील अर्जदार यांना शासकीय व खाजगी कामासाठी वारस प्रमाणपत्र याची आवश्यकता आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहू अर्जदार मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्यांनी हया कोर्टात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि हया लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास, त्यांना सदरहू मयत कुमार दत्तात्रय शिशद यांचे वारस असल्या बाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याचीनोंद घ्यावी.

आज दिनांक १७ माहे ०३ सन २०२६ रोजी माझ्या सहिने व न्यायालयाचे शिक्याने दिले.

**सदर प्रकरणाची पुढील तारीख दि०४/०५/२०२६ आहे.**

**शिक्का** | **(स्वाक्षरीत) क. लिपीक** | **आदेशावरून (स्वाक्षरीत) अधिक्षक दिवाणी न्यायालय क. स्तर बीड**

महाराष्ट्राचा बुलंद आवाज • छत्रपती संभाजीनगर • जालना • बीड • परभणी • लातूर • नांदेड • धाराशिव • हिंगोली • अहिल्यानगर


दैनिक
# मराठवाडा पत्र

• संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे • जिल्हा विशेष • बुधवार दि. १८ मार्च २०२६ •

## थोडक्यात...

### समाधी महोत्सवासाठी जय्यत तयारी पूर्ण

सावरगाव येथे 'नाथ संजीवन समाधी महोत्सवा'ची लगबग ; भाविकांच्या स्वागतासाठी सर्व व्यवस्था सज्ज



**आष्टी । प्रतिनिधी**

तालुक्यातील श्री क्षेत्र मच्छिंद्रनाथ देवस्थान, सावरगाव येथे होणाऱ्या 'नाथ संजीवन समाधी महोत्सव २०२६' निमित्त सध्या जय्यत तयारी करण्यात आली आहे. १४ मार्च ते १९ मार्च दरम्यान पार पडणाऱ्या या भव्य धार्मिक सोहळ्यासाठी देवस्थान ट्रस्ट, ग्रामस्थ व स्वयंसेवकांनी एकत्र येत सर्व आवश्यक व्यवस्था पूर्ण केल्या आहेत. महोत्सवादरम्यान देशभरातून येणाऱ्या हजारो भाविकांच्या सोयीसाठी निवास, पिण्याचे पाणी, वाहतूक, आरोग्य सेवा तसेच सुरक्षा व्यवस्थेची काटेकोर तयारी करण्यात आली आहे. मंदिर परिसराची स्वच्छता, सजावट व प्रकाशयोजना करण्यात आली असून, गड परिसर भाविकांच्या स्वागतासाठी सज्ज झाला आहे. महोत्सवातील प्रमुख धार्मिक कार्यक्रमांसाठी विशेष नियोजन करण्यात आले आहे. निशाण प्रस्थान, कावड आगमन, महाआरती, जलाभिषेक व महापूजा या विधी सुरळीत पार पडावेत यासाठी स्वयंसेवकांची नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच भाविकांना कोणतीही अडचण येऊ नये यासाठी मार्गदर्शन केंद्रही उभारण्यात आले आहेत. देवस्थान ट्रस्टकडून भाविकांना शिस्त पाळण्याचे, स्वच्छता राखण्याचे तसेच प्लास्टिकचा वापर टाळण्याचे आवाहन करण्यात आले आहे. विशेषतः कावडधारकांसाठी वेळेचे नियोजन करण्यात आले असून, सर्वांनी नियमांचे पालन करावे, असे आवाहन करण्यात आले आहे. एकूणच, सावरगाव येथे होणाऱ्या या 'नाथ संजीवन समाधी महोत्सवा'साठी जय्यत तयारी पूर्ण झाली असून, भक्तिमय वातावरणात हा सोहळा उत्साहात पार पडणार असल्याचे चित्र दिसत आहे.

## येडेश्वरीचे सर्वाधिक गाळप; कारखान्याचा गळीत हंगाम यशस्वीरीत्या संपन्न

**९.२२ लाख मेट्रिक टन ऊस गाळप ; खा.बजरंग सोनवणे यांनी शेतकरी-कामगारांचे केले कौतूक**

**केज । प्रतिनिधी**

तालुक्यातील आनंदगाव येथील येडेश्वरी साखर कारखाना लि. (युनिट क्र.१) चा सन २०२५-२६ चा गळीत हंगाम मिल पूजन करून उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. ऊस उत्पादक शेतकरी, कारखान्याचे पदाधिकारी, अधिकारी व कर्मचारी यांच्या एकत्रित प्रयत्नांमुळे यंदाचा गळीत हंगाम यशस्वीरीत्या पूर्णत्वास गेला. बीड जिल्ह्यात सर्वाधिक उसाचे



गाळप येडेश्वरी कारखान्याने केले आहे. कारखान्याकडून यंदाच्या हंगामात एकूण ९,२२,११६.३७९ मेट्रिक टन ऊस गाळप करण्यात आले असून, ही कामगिरी कारखान्यासाठी निश्चितच अभिमानास्पद मानली जात आहे. संपूर्ण हंगामात ऊस पुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी शेतकरी आणि कारखाना प्रशासन यांच्यात चांगला समन्वय राखण्यात आला. तसेच कामगारांचे नियोजन, वाहतूक व्यवस्था आणि तांत्रिक व्यवस्थापन यामुळे गळीत प्रक्रिया निर्विघ्नपणे पार पडली. गळीत हंगामाच्या सांगता समारंभानिमित्त मिल पूजन करण्यात आले. यावेळी कारखान्याच्या प्रगतीसाठी सर्व घटकांनी परिश्रम घेतल्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यात आली. यावेळी खा.बजरंग सोनवणे म्हणाले, 'येडेश्वरी साखर कारखान्याचा २०२५-२६ चा गळीत हंगाम यशस्वीरीत्या पूर्ण होणे ही आनंदाची बाब आहे. ऊस उत्पादक शेतकरी, कारखान्याचे पदाधिकारी, अधिकारी, कर्मचारी व कामगार यांच्या संयुक्त परिश्रमांमुळे ही उल्लेखनीय कामगिरी शक्य झाली आहे. सर्व संबंधितांचे मन:पूर्वक अभिनंदन करतो. पुढील गळीत हंगाम अधिक यशस्वी व्हावा, अशी अपेक्षा व्यक्त करतो, असेही ते म्हणाले. दरम्यान, या यशस्वी हंगामानिमित्त ऊस उत्पादक शेतकरी, कामगार, अधिकारी व कर्मचारी यांचे सर्व स्तरातून अभिनंदन करण्यात येत असून, पुढील हंगामासाठीही उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

## छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर अभियान पेंडगाव येथे उत्साहात संपन्न

**लोकाभिमुख कामे करणे हे माझे प्रथम कर्तव्य आहे : तहसीलदार शेळके**

**बीड । प्रतिनिधी**

शासनाच्या महसूल व वन विभागामार्फत राबविण्यात येत असलेल्या छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान अंतर्गत पेंडगाव येथे दिनांक १७ मार्च रोजी आयोजित करण्यात आलेले महाराजस्व समाधान शिबिर नागरिकांच्या उत्स्फूर्त प्रतिसादात आणि उत्साही वातावरणात संपन्न झाले . पेंडगाव येथील हनुमान मंदिर परिसरात पार पडलेल्या या शिबिरामध्ये शेतकरी



, ग्रामस्थ , महिला बचत गट , विद्यार्थी तसेच विविध सामाजिक घटकांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवित शासनाच्या विविध सेवांचा लाभ घेतला .

राज्य शासनाने महसूल प्रशासन अधिक लोकाभिमुख , पारदर्शक आणि गतिमान करण्याच्या उद्देशाने छत्रपती शिवाजी महाराजांच्या नावाने हे महाराजस्व अभियान सुरु केले आहे . नागरिकांना महसूल विभागाच्या सेवा त्यांच्या गावातच उपलब्ध करून देणे , प्रलंबित प्रकरणांचा तातडीने निपटारा करणे तसेच शासनाच्या विविध योजनांची माहिती तळागाळापर्यंत पोहोचवणे हा या अभियानाचा मुख्य हेतू आहे . पेंडगाव येथे आयोजित शिबिराने या उद्दिष्टांना प्रत्यक्षात साकार स्वरूप दिल्याचे चित्र पाहायला मिळाले . या कार्यक्रमाचे आयोजन जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते . कार्यक्रमास तहसीलदार चंद्रकांत शेळके यांची प्रमुख उपस्थिती लाभली. प्रशासनातील वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या उपस्थितीमुळे शिबिराला विशेष महत्त्व प्राप्त झाले . कार्यक्रमास निवासी नायब तहसीलदार सुहास हजारे , नायब तहसीलदार प्रशांत जाधवर , निवडणूक विभागाचे नायब तहसीलदार सुरेंद्र डोके , नायब तहसीलदार अण्णासाहेब वंजारे , पुरवठा निरीक्षक प्रशांत सुपेकर ,

▶▶ उर्वरित पान २ वर

## स्नेह मेळाव्यातून विचारांची देवाण-घेवाण होते : डॉ. अजयदादा धोंडे

**आष्टी । प्रतिनिधी**

गेट-टुगेदर सारख्या कार्यक्रमातून विचारांची देवाण-घेवाण होते त्यामुळे प्रत्येक वर्षी असे कार्यक्रम आयोजित करायला पाहिजेत असे मत राष्ट्रवादी काँग्रेसचे युवा नेते व शेतकरी शिक्षण प्रसारक संस्थेचे सचिव डॉ. अजयदादा धोंडे यांनी केले.

याबाबत अधिक माहिती आष्टी येथील शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळ, आनंद चॅरिटेबल संस्था व भगिनी या संस्थांमधील सेवानिवृत्त सर्व कर्मचाऱ्यांचा स्नेह मेळावा कर्जत तालुक्यातील मांदळी येथील हॉटेल सुवर्ण ज्योत येथे आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाच्या



अध्यक्षस्थानी शहाबुद्दीन सय्यद हे होते. प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे डॉ. अजयदादा धोंडे उपस्थित होते. याप्रसंगी व्यासपीठावर सेवानिवृत्त प्राचार्य व संस्थेचे प्रशासकीय अधिकारी डॉ. डी. बी. राऊत,डी. एस. राऊत, हभप मगर महाराज,मुख्याध्यापक शिवाजी वनवे, महादेव दानवे, अनभुले, गदादे,

▶▶ उर्वरित पान २ वर

## कांदा काढणी जोरात; भाव घसरल्याने शेतकरी चिंतेत ; मजुरी वाढल्याने खर्चात झाली मोठी वाढ

**पिंपळनेर । प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील पिंपळनेरसह परिसरात सध्या उन्हाळी कांद्याची काढणी मोठ्या प्रमाणात सुरू झाली असून, शेतकरी शेतात काढणीच्या कामात व्यस्त आहेत. मात्र, बाजारात कांद्याचे भाव घसरल्याने शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण आहे. कांद्याचे बाजार भाव एकीकडे पडले, तर कांदा काढण्यासाठी लागणाऱ्या मजुरांचे दर मात्र आकाशाला भिडले आहेत. एका जोडीला हजार रुपये मोजावे लागत आहेत. या ठिकाणी कांदा काढण्यासाठी मजुरांची अगदी पळवापळवी देखील पाहायला मिळत आहे. तालुक्यातील नाथापुर, जवळा,नाळवंडी , बेलवाडी, बाभुळवाडी, सांडरवन , पिंपळगाव ,ईट,घाटसावळी परिसरात सध्या कांदा काढणी सुरू झाली आहे.

या भागांत मोठ्या प्रमाणात कांद्याची लागवड झाली होती. हवामान अनुकूल राहिल्याने उत्पादन चांगले झाले आहे. मात्र, सध्या बाजारात कांद्याला प्रतिक्विंटल सुमारे ८०० ते १२०० रुपये दर मिळत असल्याने उत्पादन खर्च वसूल होणेही कठीण झाले आहे,असे शेतकरी सांगतात. मजुरी दर वाढले कांदा काढणीसाठी मजुरांची मोठ्या प्रमाणात आवश्यकता असते. सध्या तालुक्यात मजुरांना दररोज सुमारे ▶▶ उर्वरित पान २ वर

## गितांजली लव्हाळे यांना पद्मश्री ; सिंधुताई सपकाळ माई सेवारत्न पुरस्काराने सन्मानित

**वडवणी । प्रतिनिधी**

स्त्री शक्ती प्रतिष्ठान बीड व पसायदान सेवा प्रकल्प ढेकानमोहा यांच्या संयुक्त विद्यमाने प्रति वर्षाप्रमाणे याही वर्षी जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून समाजाच्या सर्व घटकातील संघर्षशील आणि कर्तृत्ववान महिलांची निवड करून त्यांना अनाथांची माय डॉक्टर सिंधुताई सपकाळ यांच्या नावाने दिला



जाणारा सेवा रत्न पुरस्कार सोहळ्यात ओढून येथील नामवंत महिला पत्रकार सौ. गितांजली रंगराव लव्हाळे .यांना उत्साहाच्या वातावरणात प्रदान करण्यात आला. शिवसंग्राम या सामाजिक संघटनेच्या सर्व डॉक्टर ज्योती ताई मेटे यांच्या प्रमुख अध्यक्षतेखाली घेण्यात आलेल्या या सोहळ्यात प्रमुख अतिथी म्हणून जिजाऊ ब्रिगेडच्या जिल्हाध्यक्ष प्राध्यापक संगीत सरपंच मंजु गाडीवान, जिजाऊ सेवा संस्थेच्या संस्थापक सौ शोभा घुमरे, शितल धोंडरे, शोभा घुमरे, भारती क्षीरसागर कीर्ती पांगरकर बाला घाट इंग्लिश स्कूल प्रियंका तोष्णीवाल, ज्योतीताई विधाते, रंजना दराडे, यांच्यासह अनेक मान्यवरांची उपस्थिती लाभली. वडवणी येथील पत्रकार तथा मुख्याध्यापिका म्हणून पत्रकारिता, शिक्षण आणि समाजसेवा क्षेत्रातील मानाचा समजला जाणारा सेवारत्न पुरस्कारांनी सन्मानित केल्याने त्यांचं सर्वस्तरातून अभिनंदन होत आहे.

## पालकांसाठी आनंदवार्ता! आरटीई प्रवेशासाठी मुदतवाढ

## 1 कि.मी.ची अट शिथिल, आता 3 व 5 किमीपर्यंत शाळांचे पर्याय

### अगोदर दाखल केलेले विद्यार्थ्यांना अर्ज अपडेट करता येणार : मनोज जाधव

**बीड । प्रतिनिधी**

शिक्षणाचा हक्क कायदा (आरटीई) अंतर्गत खासगी विनाअनुदानित शाळांमधील २५ टक्के राखीव प्रवेशासाठी सुरू असलेल्या ऑनलाइन प्रक्रियेत महत्त्वाचा बदल करण्यात आला आहे. मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाच्या निर्देशानुसार शाळेच्या अंतरासंबंधीची एक किलोमीटरची अट शिथिल करण्यात आली असून आता पालकांना तीन व पाच किलोमीटरपर्यंतच्या शाळांचे पर्याय निवडण्याची संधी मिळणार



आहे.तसेच अर्जामध्ये दुरुस्ती किंवा नवीन अर्ज भरण्यासाठी २५ मार्च २०२६ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. अशी माहिती शिवसंग्रामचे युवा नेते तथा आरटीई कार्यकर्ते मनोज जाधव यांनी दिली आहे. दरम्यान, १२ फेब्रुवारी रोजी काढण्यात आलेल्या शासन निर्णयानुसार आरटीई प्रवेशासाठी पालकांना केवळ निवासस्थानापासून एक किलोमीटर अंतरातील शाळाच निवडण्याची अट घालण्यात आली होती. मात्र, या निर्णयाविरोधात मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात जनहित याचिका दाखल करण्यात आली. या याचिकेवरील सुनावणीदरम्यान न्यायालयाने महत्त्वपूर्ण निरीक्षण नोंदवित एक किलोमीटरची सक्ती योग्य नसल्याचे स्पष्ट केले. त्यामुळे शासनाने नियमांमध्ये सुधारणा करून पालकांना अधिक अंतरावरील शाळांचे पर्याय उपलब्ध करून द्यावेत, असे आदेश न्यायालयाने दिले.

या आदेशानुसार शिक्षण विभागाने आरटीई प्रवेशासाठीच्या ऑनलाइन प्रणालीमध्ये आवश्यक तांत्रिक बदल करण्याचा निर्णय घेतला आहे. आता प्राधान्याने एक किलोमीटर, त्यानंतर तीन किलोमीटर आणि पाच किलोमीटर अंतरातील शाळांचे पर्याय पालकांना निवडता येणार आहेत.

▶▶ उर्वरित पान २ वर

**● २२ शाळांचे लोकेशन आरटीई पोर्टलवर चुकले ; गोरगरीब विद्यार्थी प्रवेशाला मुकले**

**बीड जिल्ह्यातील अंबेजोगाई, आष्टी व केज तालुक्यातील तब्बल २२ शाळांचे लोकेशन आरटीई पोर्टलवर चुकीचे अपलोड झाल्याने अनेक विद्यार्थ्यांच्या प्रवेशावर परिणाम होत असल्याची गंभीर बाब समोर आली आहे.आरटीई प्रवेश प्रक्रियेअंतर्गत शाळांची नोंदणी व व्हेरिफिकेशन करण्यासाठी जवळपास एक महिन्याचा कालावधी देण्यात आला होता. तरीही या प्रक्रियेत मोठ्या प्रमाणात त्रुटी राहिल्याचे दिसून येत आहे. विशेष म्हणजे अंबेजोगाई तालुक्यात सर्वाधिक शाळांचे लोकेशन चुकीचे नोंदवले गेले आहे. त्यामुळे शाळेजवळ राहणाऱ्या पात्र विद्यार्थ्यांनाही त्या शाळेत अर्ज करता येत नसल्याने पालकांना अडचणींचा सामना करावा लागत आहे.**

**● लोकेशन चुकले की जाणीवपूर्वक चुकवले ? - मनोज जाधव**

**या प्रकरणावर प्रतिक्रिया देताना सामाजिक कार्यकर्ते मनोज जाधव यांनी सांगितले की, आरटीई पोर्टलवर शाळांचे लोकेशन चुकीचे नोंदवणे ही अत्यंत गंभीर बाब आहे. एखाद्या शाळेचे स्थलांतर करायचे असल्यास त्यासाठी शासनाकडे प्रस्ताव सादर करून मंत्रिमंडळाची मान्यता घेतल्यानंतरच शासन निर्णयाद्वारे शाळेचे स्थलांतर करता येते. त्यानंतरच शाळेचे लोकेशन बदलणे शक्य असते.**